# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ

आयुकाजवळ, गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

दूरध्वनी क्र. ०२०–२५६०११४३, २५६०११४२, टेलिफॅक्स २५६९७५११


संदर्भ : विक्रीमं/आंतरविभागीय स्पर्धा मागणीपत्र/८४४८ दिनांक: ०६ एप्रिल, २०२३.

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्न महाविद्यालये व
मान्यताप्राप्त संस्था

**विषय : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ आंतर विभागीय क्रीडा स्पर्धा आयोजन मागणी पत्र शैक्षणिक वर्ष २०२३–२०२४ बाबत.**

महोदय/महोदया,

वरील विषयास अनुसरून आपणांस या पत्राद्वारे विनंतीपूर्वक कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२३–२४ मध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या कक्षेत समाविष्ठ असलेल्या पुणे शहर, पुणे जिल्हा, अहमदनगर जिल्हा, नाशिक जिल्हा या विभागांच्या स्थानिक कक्षेत समाविष्ट असलेली महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था यांचे वतीने विविध क्रीडाप्रकारांच्या आंतर विभागीय क्रीडा स्पर्धा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या विद्यमाने व संबंधीत महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था मागणीपत्रास अनुसरून प्रतीवर्षी प्रमाणे आयोजित करण्यात येणार आहेत.

सबब आपले महाविद्यालय/संस्था सदर स्पर्धेपैकी किमान एक किंवा दोन स्पर्धा आयोजित करू इच्छित असेल तर सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यामध्ये सविस्तर माहिती भरून **गुरूवार, दि. २७ एप्रिल, २०२३** अखेरपर्यंत क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ कार्यालयास सदरचे पत्र प्राप्त होताच स्वहस्ते अथवा टपालाद्वारे पाठवावे, ही विनंती.

धन्यवाद! सहकार्याची अपेक्षा!

कळावे,

आपला,

संचालक,
क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ

(टीप : स्पर्धा आयोजनास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ कार्यालयाकडून आपणांस स्पर्धा संपल्यानंतर स्पर्धा आयोजनाचे अनुदान (सोबत) विनियोग प्रमाणपत्र सादर केल्यानंतर त्वरीत अदा केले जाईल याबाबत कृपया नोंद घ्यावी, ही विनंती.)

(कृपया मागे पहा....

जोडपत्रः

| | | | |
|---|---|---|---|
| १) | क्रीडा प्रकाराचे नाव | | |
| २) | निवास व्यवस्था | महिला व पुरूषांकरीता स्वतंत्र आहे का? | आहे / नाही |
| ३) | क्रीडांगणे | कोणत्या खेळांसाठी आहेत? | आहे / नाही |
| ४) | प्रसाधनगृहे | महिला व पुरूषांकरीता स्वतंत्र आहे का? | आहे / नाही |
| ५) | निष्णात पंच | संबंधित खेळातील पंच जिल्हा / राष्ट्रीयस्तरीय / राज्यस्तरीय परीक्षा उत्तीर्ण आहेत का? | आहे / नाही |
| ६) | वैद्यकीय व्यवस्था | वैद्यकीय व्यवस्था आहे का? किंवा उपलब्ध करून देणार आहात का? | आहे / नाही |
| ७) | इनडोअर स्पर्धांकरीता (टेबलटेनिस, बुध्दिबळ, कुस्ती, ज्युदो, बॅडमिंटन, वेट व पॉवर लिफ्टिंग, शरीरसौष्ठव, तलवारबाजी, योगासने) | विद्युत व्यवस्था आहे का? | आहे / नाही |

**शारीरिक शिक्षण संचालक** **प्राचार्य**

**महाविद्यालयाचा शिक्का**